निवेदन - २

आजचा दिवस माझ्यासाठी विशेष आहे. विशेष अशासाठी की जवळपास पंधरा वर्षांपूर्वी मी (२००७मध्ये) सुरू केलेल्या माझ्या वडिलांच्या, सुमारे चार दशकात (१९२८-२९ ते १९६४-६५) केलेल्या, साहित्यसेवेची मला जमेल तशी नोंद करण्याचे माझे काम आज पुरे होत आहे.

raghuveersamant.com हे संकेतस्थळ सरूवातीला ज्या नवशिक्या (amateurist) पद्धतिने आम्ही घरातल्याच लोकांनी (मी, माझा मुलगा ओंकार व भाची अश्विनी यांनी) पूर्वी दि २१-०८-२०२० रोजी स्थापन केले होते, त्या तुलनेत ते आता नव्याने, अधिक तपशीलाने, परिपूर्णतेने नव्या रूपात सादर करणे शक्य होत आहे.

माझ्या मर्यादित बुद्धि-कुवतीच्या जोरावर एकांड्या शिलेदाराप्रमाणे हे काम मी इथवर आणू शकलो याचे खूप समाधान आहे. उर्वरित साहित्याच्या आधारे ते आणखीहि सुधारून वाढविता येणे सहज शक्य आहे. मात्र यापुढे माझ्याकडून (माझे वय व सध्याचे प्रकृतिमान विचारात घेता) ते शक्य होणे जवळ जवळ नाहीच. कुणी उत्साही, नव्या दमाची व्यक्ति यात भरहि घालू शकेल. समालोचनात्मक लिखाणाची त्यात भर घालण्यास वाव आहे. शिल्लक असलेले, न वापरलेले साहित्यहि, त्यासाठी वापरता येऊ शकेल. कुणा अभ्यासू वरिष्ठाकडून तसे काही लेखन अपेक्षित असले, तरी ते अद्याप शक्य झालेले नाही.

हे संकेतस्थळ म्हणजे माझ्याकडून आमच्या वडिलांची स्मृति जागती ठेवण्याच्या उद्देशासह एक साहित्यिक म्हणून त्यांनी केलेली मराठी भाषेची सेवा व त्यांचे बहु आयामी व्यक्तिमत्त्व सर्वांसमोर खुले करून मांडण्याचाहि तो एक प्रयत्न आहे. ते अत्यंत प्रयोगशील होते व नेहेमीच काही नाविन्यपूर्ण करण्याचा प्रयत्न करीत. सतत कामात व्यग्र-व्यस्त असत. बऱ्याच बाबतीत ते "प्रथम"हि होते. मागील शतकातील एक बहु-आयामी साहित्यिक व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना श्रेय देण्याच्या बाबी मी विशेषत्वाने इथे नोंदवतो त्या खालीलप्रमाणे -

१)वयाच्या १४-१५व्या वर्षापासून (डहाणूला असताना) त्यांनी लेखनाला प्रारंभ केला. दि २४-१२-१९२४ रोजी (नाशिकला असताना) "अंधुक आठवण" हे त्यांनी लिहिलेले पहिले शब्दचित्र. पुढे "सुभान्या" (एप्रिल१९२९) हे शब्दचित्र जून१९२९मध्ये 'प्रगति' मध्ये प्रसिद्ध झाले व तेथूनच शब्दचित्र या नव्या वाङ्मय प्रकाराला अधिकृत मान्यता मिळाली. सामंत 'शब्दचित्र'कार झाले. वय होते विसावे. नाट्यछटा म्हणजे 'दिवाकर' (गर्गे) त्याप्रमाणे शब्दचित्र म्हणजे 'कुमार रघुवीर' असे समीकरण विशीतच झाले.

२)२४-१२-१९३२ रोजी त्यांचा पहिला संग्रह "हृदय" हा प्रकाशित झाला. वय होते तेविस. स्वतः पदवीधर नसतानाहि 'हृदय' मुंबई विद्यापीठाने (नवे वाङ्मय म्हणून) क्रमिक पुस्तकात लावले होते हे विशेष.

३)प्रगति बंद झाल्यानंतर (१९३३त) पूर्व नियोजन व भरपूर प्रयत्न करून त्यांनी वाङ्मयीन उच्च अभिरूची जोपासण्याच्या उद्देशाने जानेवारी १९३४ पासून "पारिजात" मासिक सुरू केले. वय होते चोवीस. रसिकांच्या पसंतिला उतरूनही दुर्दैवाने ते अल्पजीवि ठरले व खूपसे आर्थिक नुकसानही झाले.

४)त्यानंतर बीटी करून त्यानी १९३७मध्ये शिक्षकी पेशा निवडला व बरोबरीनेच ते कादंबरी लेखनाकडे वळले. त्यांनी मराठीत प्रथमच दोन पिढ्यांच्या कौटुंबिक कथेची मांडणी करणारी कादंबरी मालिका

लिहिली. त्या मालिके अंतर्गत त्यांनी चार खंडात कथानक लिहिले. 'प्रवासातील सोबती' (मार्च १९३८), 'अभ्र पटल' (मार्च १९३८), आकाशगंगा (एप्रिल १९४०) व 'घरोघरच्या देवी (२४१२-१९४४०) असे ते चार खंड आहेत. ही प्रदीर्घ कादंबरी ७८० पानांची आहे व कादंबरी लेखनाचा एक मैलाचा दगड मानली जाते. बरोबरीनेच अन्य कादंबऱ्या, कथासंग्रह, लघुनिबंधसंग्रह, काव्य, बालवाङ्मय अशी विविध प्रकारची बरीच पुस्तके १९४० ते १९५९-६० पर्यंत या प्रकारात सादर करीत राहिले. १९६० नंतर ते शालेय ज्ञानकोशाकडे वळले.

५)ते एक विदयार्थीप्रिय शिक्षक होते. आपल्या विशिष्ट शिकविण्याच्या पद्धतिने ते लेखन व भाषा वापराला सर्वाना उत्तेजन देत व प्रवृत्तहि करीत असत. गायन, नाट्य, काव्यगायन या साऱ्यावर त्यांचा विशेष जोर असे कारण ते स्वतः गायन-वादन उत्तम शिकलेले होते. त्यामुळेच प्रसिदध व मैत्रीतील कवींची उत्तम काव्ये निवडून ते चाली बांधून काव्यगायनहि करीत. त्यांचे कार्यक्रम होत. रेडिओवरही होत. युद्धकाळाआधी (१९३८त) त्यांनी स्वतःच्या काही रेकॉर्डस् काढल्या. या साऱ्यामुळेच त्यांचे काही विद्यार्थी पुढील आयुष्यात प्रसिदध लेखक व पत्रकारहि झाले. (उदा. - जयवंत दळवी, रवींद्र पिंगे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, विजय तेंडुलकर, मनोहर देवधर, श्रीकांत पालेकर, दशरथ पुजारी इ)

६)त्यांनी आपल्या चुलतबंधु बरोबर १९४१ ते १९४४ या दरम्यान "चिरंजीव" अर्थात मार्कंडेय या चित्रपट निर्मितित भाग घेतला होता. त्यातील पटकथा, संवाद, गीते इ. ची जबाबदारी त्यांनी पेलली होती. दुर्दैवाने त्या बोलपटाचे त्यांचे ते प्रयत्न यशस्वी झाले नाहीत. त्यांनी १९४९ ते १९५३ मध्ये खंडाळा येथे घाटमाथ्यावर मध्यमवर्गीयांसाठी पर्यटनकेद्रहि चालविले. चार वर्षांनंतर तेहि अयशस्वी ठरले. पुढे १९५४ ते १९५६ या काळात शारदाश्रम विद्यामंदिर ही शाळा तिच्या स्थापनेच्या काळात संस्था चालकांसाठी नेटकेपणे चालविली. परंतु लवकरच संस्थाचालकांशी मतभेद झाल्याने ते १९५६मधे तेथून बाहेर पडले.

७)१९६१त मराठा मंदिर शाळा सोडताना पुढे त्यांच्या मनात दोन तीन कादंबऱ्यांचे लेखन हाती घेण्याचा विचार घोळत होता. परंतु भारत सरकारची आगाउ रोख मदत मिळाल्याने त्यांनी ते नियोजित कादंबरी लेखन बाजूला सारून शालेय ज्ञानकोशाचे काम हाती घेतले. त्याअंतर्गत काढलेले दोन खंड हे त्यांचे शेवटले मोठे काम. नंतर मित्रमंडळी व घरातल्या लोकांच्या आग्रहाखातर आत्मचरित्र लेखनास ते तयार झाले. पण त्या कामाची फक्त टिपणे तेवढीच त्यांचेकडून झाली. प्रत्यक्ष लेखन होउ शकले नाही. बदललेया कौटुंबिक, सामाजिक व आर्थिक परिस्थितिशी ते जुळवून घेऊ शकले नाहीत.

अशा रीतिने त्यांचे सारे जीवन घटनांनी भरलेले, संघर्षमय व एका मागे एक येत जाणाऱ्या अनपेक्षित अपयशांनी भरलेले होते. भरीला भर म्हणून सहाव्या वर्षापासून वयाच्या ३८-३९ पर्यंत म्हणजे वडिलांच्या मृत्यूपर्यंत त्यांच्या वाट्याला घरातले सावत्रपणहि आले होते. ओघाओघानेच आलेली आर्थिक चणचणहि त्यांच्या वाट्याला कायमच होती. असे सारे प्रतिकूल वातावरण असूनहि त्यातून मार्ग व वेळ काढून त्यानी मराठी वाङ्मयाच्या जवळपास प्रत्येक दालनात काही ना काही योगदान दिले. त्यांचे प्रकाशित वाङ्मय सुमारे ७००० पानांचे असावे. साऱ्यावर कळस म्हणून की काय त्यांची ही बहुसंख्य पुस्तके त्यांनी स्वतः छापवून स्वतःच्या प्रकाशनामार्फत प्रकाशित केली. त्यावरचे सारे हक्क स्वतःकडेच अबाधित राखले.

गेल्या पंधरा वर्षात या संकेतस्थळाच्या कामाची सर्व स्थित्यंतरे जवळून पाहिल्यानंतर हे काम माझ्या हातून पार पडले आहे यावर माझा स्वतःचाच विशवास बसत नाही. अधिक विचार केल्यावर असे लक्षात आले की माझ्या सुविद्य पत्नीच्या बहुमोल मदतिविना हे काम माझ्या हातून घडते ना. हे काम तडीस नेण्याचे श्रेय माझ्या इतकेच तिलाहि मोकळेपणाने द्यायला हवे.

दीपक रघुवीर सामंत
नेरूळ, नवी मुंबई.
दि २५-०६-२०२२